# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

जा.क्र.आयएफएमएस /उअ/ड्रेनेज/तारापूर/ D15969/२०१४
उप अभियंता यांचे कार्यालय,
मऔविम, ड्रेनेज उपविभाग, तारापूर
दिनांक :- 11/11/2014

MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD
Inw 2911
Date 11/11/14
SUB-RE...

प्रति,
उप प्रादेशिक अधिकारी
म.प्र.नि.मंडळ
तारापूर

**विषय:-** औद्योगिक वसाहत, तारापूर पर्यावरण रक्षण व संवर्धन समितीच्या दि.११/०९/२०१४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्तांता बाबत.

महोदय,

दि.११/०९/२०१४ रोजी मा. अध्यक्ष, "औद्योगिक वसाहत, तारापूर पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती" ची बैठक टिमा हॉल, तारापूर औद्योगिक क्षेत्र येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तांताची छायांकित प्रत आपले माहितीसाठी व अवलोकनार्थ सोबत जोडण्यात आली आहे.

कळावे,

आपला विश्वासू,
9/9

सदस्य सचिव,
औद्योगिक वसाहत, तारापूर पर्यावरण
रक्षण व संवर्धन समिती तथा
उप अभियंता, मऔविम, तारापूर

सोबत:- वरील प्रमाणे

Received
11/11/14

11/11/14

# " औद्योगिक वसाहत, तारापूर पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती " च्या दि. ११/०९/२०१४ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त

दि.११/०९/२०१४ रोजी मा.अध्यक्ष, औद्योगिक वसाहत, तारापूर पर्यावरण रक्षण व संवर्धन समिती तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), ता.पालघर, जि.ठाणे यांनी औद्योगिक वसाहत, तारापूर पर्यावरण रक्षण व संवर्धन समितीची बैठक टिमा हॉल, तारापूर औद्योगिक क्षेत्र येथे आयोजित केली होती. या बैठकीस उपस्थित सदस्यांची यादी सोबत जोडली आहे.

मा.अध्यक्षांनी सदर समितीच्या सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली. अध्यक्षानी प्रथम सदस्य सचिव यांना मागील बैठकीचा इतिवृत्तांताच्या फोटो प्रती सर्व उपस्थित सदस्यांना देण्यास सांगितले. मा.सदस्य सचिव यानी इतिवृत्तांतातील मुद्दे खालील प्रमाणे मांडले.

१. म.औ.वि. महामंडळ, तारापूर परिसर व सागरी किनारपट्टी येथील प्रदूषणा संबंधीच्या तक्रारीचा आढावा/पाहणी करणे व प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविणे.

मा.अध्यक्षांनी मऔवि महामंडळ, तारापूर व सागरी किनारपट्टी या परिसरातील संबंधित श्री.बारी, मच्छिमार संघटना विविध कार्यकारी संघटना, नवापूर व श्री. वायडा, सहा.उपआयुक्त मस्त्य व्यवसाय यांना याबाबत अशा काही नवीन तक्रारी प्राप्त झाल्या काय याबाबत विचारणा केली. श्री.बारी यांनी समुद्रात घातक व प्रदूषित पाणी सोडल्यामुळे मासे मरतात व जे जिवंत मासे आहेत ते कोणी खाऊ शकत नाही असे सांगितले तसेच श्री.वायडा यांनी पुर्वी प्रमाणेच पाणी काळे आहे असे सांगितले.

अध्यक्षांनी सीईटीपी मध्ये कसे व किती सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते, सध्या औद्योगिक क्षेत्रात किती कंपन्या आहेत, कोणकोणत्या कंपन्या दुषित सांडपाणी सोडतात, याबद्दल विचारणा केली. तेव्हा श्री.ननावरे, सदस्य सचिव तथा उप अभियंता मऔविम, ड्रेनेज उपविभाग, तारापूर यांनी औद्योगिक क्षेत्रात एकूण १९६० भूखंड आहेत, त्यापैकी सुमारे १६०० भूखंड कंपन्यांना देण्यात आले आहेत असे सांगितले. श्री. भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांनी औद्योगिक क्षेत्रात कंपन्यांचे सांडपाण्याच्या उत्पादनानुसार Red/orange/green असे वर्गिकरण करण्यात आले आहे. त्यात Red म्हणजे Highly polluting. Orange- medium & green- non polluting असे वर्गिकरणात करण्यात येते. तारापूर औद्योगिक क्षेत्रात एकूण ४७२ कंपन्या हया Red वर्गिकरणात येतात. त्यापैकी मेजर ५०, मध्यम २८ व लहान ३९४ कंपन्या आहेत, असे सांगितले.

या उत्तरामुळे अध्यक्षांचे समाधान न झाल्यामुळे पुढील सभेपुर्वी खालील माहिती देण्याबाबत श्री.भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांना सुचना दिल्या.

| | |
|---|---|
| औद्योगिक क्षेत्रात एकूण भूखंड संख्या - | २१०५ |
| कंपन्यास वाटप भूखंड - | १९४७ |
| Categories wise | |

| | |
|---|---|
| Red | ४७२ |
| Organge- | १५५ |
| Green | ८५० |
| Total members of CETP- | ६२७ |

तसेच मा.अध्यक्ष महोदयांनी, उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांना तारापूर औद्योगिक क्षेत्रातील १० Highly polluted कंपन्यांची यादी तयार करुन त्यांचे स्वतःचे EPC नियमानुसार सुरु आहेत किंवा कसे? याची चौकशी म.प्र.नि.मंडळाचे श्री.भासेले यांनी करुन त्याचा अहवाल पुढील बैठकीमध्ये समितीपुढे मांडावा असे सांगितले. तसेच म.प्र.नि.मंडळाने एमआयडीसी मधील Highly polluting कंपन्यांवर काय कार्यवाही केली, त्यांनी त्याचे प्रदूषण कमी झाले किंवा नाही, याबाबत माहितीची विचारणा केली. तसेच समिती Highly polluting companies वर कार्यवाही करण्यावर भर देईल असे आश्वासन दिले.

CETP मध्ये प्रक्रिया करताना व केल्यानंतर त्याच्या गुणवत्तेवर कोण कसे नियंत्रण ठेवते याची विचारणा केली. तेव्हा श्री.जाधव, व्यवस्थापक सीईटीपी यांनी असे सांगितले की, सीईटीपी येथे प्रयोगशाळा असून तेथे सांडपाण्याच्या नमूण्यावर चाचणी केली जाते व म.प्र.नि.मंडळच्या नार्म प्रमाणे सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. म.प्र.नि.मंडळ सुध्दा नियमित सांडपाण्याचे सॅम्पल/नमुने चाचणी करीता घेतात. सीईटीपी सुरु झाल्यापासून आजपर्यंत सर्व २५ एमएलडी च्या सांडपाण्याचे नमुने परिक्षण अहवाल (Test Result) हे टीईपीएस च्या web site वर उपलब्ध आहेत, असे श्री.जाधव यांनी सांगितले. तद्नंतर अध्यक्षानी विचारणा केली की, औद्योगिक क्षेत्रात सुमारे ५० एमएलडी सांडपाणी निर्माण होते त्यापैकी फक्त २५ एमएलडी वर प्रक्रिया होते. उर्वरित २५ एमएलडी चे काय? ते विना प्रक्रिया करता सोडले जाते, त्याबाबत काय उपापययोजना आहे. याबाबत श्री.जाधव यांनी सांगितले की, नविन ५० एमएलडी सीईटीपीच्या कामाचा सविस्तर प्रोजेक्ट रीपोर्ट नेरी यांना मंजूरीसाठी सादर केलेला आहे. या प्रकल्पाबाबत पर्यावरण खात्याच्या दि.१४/०६/२०१४ च्या नविन परिपत्रकानुसार जनसुनावणी घेतल्या शिवाय प्रत्यक्ष बांधकाम सुरु करता येणार नाही व त्या बाबत मा.जिल्हाधिकारी यांच्या कडून तारीख निश्चित झाल्यानंतर सदर जनसुनावणी घेवून काम सुरु करण्यात येईल. या कामाच्या कंत्राटदाराची नेमणूक झालेली आहे व याकरीता अंदाजे १८ महिने लागतील. श्री.जाधव, व्यवस्थापक, सीईटीपी यांनी मा.अध्यक्षांकडे अशी मागणी केली की, जनसुनावणी न घेता नवीन सीईटीपीचे बांधकाम चालु करण्यात परवानगी दयाची. सदरची मागणी मा.अध्यक्ष महोदयांनी फेटाळून लावली व मा.जिल्हाधिका-यांसोबत लवकरच चर्चा करुन जनसुनावणीची तारीख निश्चित करण्याचे आश्वासन दिले.

यावर अध्यक्षानी सदर सीईटीपी पुर्ण झाल्यानंतर त्यासाठी आवश्यक पाईपलाईन व टाक्या बांधण्याचे काम मऔविमने हाती घेतले आहे काय, याबद्दल काय प्रगती आहे, ती कामे सुध्दा या १८ महिन्यात पुर्ण होणे गरजेचे आहे. यावर श्री.ननवरे, सदस्य सचिव तथा उप अभियंता, मऔविम, ड्रेनेज उपविभाग, तारापूर यांनी असे सांगितले की, सदर कामाचे प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव सादर करण्यात आले असून,

सीईटीपीच्या अनुषंगाने सर्व कामे लवकरच हाती घेण्यात येतील व ती सीईटीपीच्या कामासोबतच पुर्ण करण्यात येतील. त्यावर अध्यक्षानी सदर सीईटीपी साठीची पुरक कामे तातडीने हाती घ्या, असे सांगितले.

श्री.बारी अध्यक्ष मच्छिमार विविध कार्यकारी संस्था, नवापूर यांनी औद्योगिक क्षेत्रात कंपन्या ईटीपी काम करत नाहीत त्या सांडपाणी विना प्रक्रिया करता सोडतात, असे सांगितले. तेव्हा अध्यक्षानी श्री.भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांचेकडे याबाबत विचारणा केली. त्यावर श्री.भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांनी असे सांगितले की, सर्व मेजर कंपन्यांकडे fully fledged ETP असुन, औद्योगिक क्षेत्रातील सर्वच मोठया, मध्यम व लहान कंपन्यांकडे ईटीपी आहेत. फक्त लहान कंपन्यांकडे Primary treatment आहे असे सांगितले. त्यावर मा.अध्यक्षांनी सर्व कंपन्यांच्या सर्व्हे करुन ज्याच्याकडे ईटीपी नाहीत त्यांची यादी देण्यास सांगितले. तसेच Highly polluting company यांचे ETP सक्षम आहे का? त्यांचे COD, BOD तपासावेत, पाण्याचे PH तपासावेत व अवैध बाब निदर्शनास आल्यास त्यांचेवर काय कार्यवाही प्रस्तावित केली अथवा करण्यात आली, याचा अहवाल पुढील बैठकीत ठेवावा. तसेच कंपन्यांचे पाण्याचे नमूने दर महिन्यात घेवून, ज्या कंपन्या Highly polluting आहेत त्यांची यादी समितीच्या पुढील बैठकीमध्ये देण्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच माहे सप्टेंबर २०१३ मध्ये ९२ कंपन्यांवर कार्यवाही केली त्याचे नियमित मॉनिटर होते की नाही, अशी विचारणा केली असता, श्री.भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यानी असे सांगितले की, सप्टेंबर २०१३ मध्ये ९२ कंपन्यांवर म.प्र.नि.मंडळाने कार्यवाही केली होती, त्यांचे नियमित मॉनिटरींग होते. त्यापैकी ४२ कंपन्यांवर परत कार्यवाही करण्याची शिफारस या कार्यालयाने प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ,ठाणे यांना केली आहे. त्यावर अध्यक्षानी अशी विचारणा केली की, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, ठाणे यांनी या कंपन्यांवर काय कार्यवाही केली, त्याबाबतचा अहवाल समितीपुढे मांडण्यास सांगितले व पुढील बैठकीत त्यांना अहवालासह उपस्थित राहण्याबाबत कळवावे, असे सांगितले. तारापूर औद्योगिक क्षेत्र व परसिरातील प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी प्रदूषण करणा-या कंपन्यांवर कडक कारवाई होणे गरजेचे आहे, असे उपस्थित मच्छिमार संघटनेच्या प्रतिनिधींनी सुचित केले.

२. **उद्योग, साईटीपी, एमआयडीसी यांच्याकडून होणा-या प्रदूषण प्रतिबंधात्मक कारवाईचा आढावा घेऊन सुधारणा करण्याकरीता सूचना करणे**

याबाबत मा.अध्यक्षांनी सुचना केली की, सध्या औद्योगिक क्षेत्रातून २५ एमएलडी सांडपाणी प्रक्रिया करता व २५ एमएलडी विना प्रक्रिया करता सोडण्यात येते. त्या बद्दल कार्यवाही करता येणार नाही का? त्यावर औद्योगिक क्षेत्रात सध्याचे सर्व सांडपाणी एकत्रित जमा करण्यात येते, त्यापैकी फक्त २५ एमएलडी वर प्रक्रिया करण्यात येते व उर्वरित २५ एमएलडी बायपास केले जाते. ते पुन्हा एकत्रित करुनच महामंडळातर्फे समुद्रात सोडले जाते. त्यातच तांत्रिक कारणामुळे कधी मऔविमचे पंप नादुरुस्त झाले तर सदरचे सांडपाणी सम्प नं.२ मधून ओव्हरप-लो होऊन नाल्यातून शेवटी खाडीत मिसळते असे उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, तारापूर यांनी सांगितले.

त्यावर मा.अध्यक्षांनी पंपिंगचे काम मऔवि महामंडळात कोण पाहते याची विचारणा केली व यापुढे त्यांना या समितीच्या बैठकीत उपस्थित राहण्याबाबत कळवावे अशा सुचना दिल्या. तसेच कंपनीचे स्वतःचे ETP मधूनच चांगली प्रक्रिया करुन CETP कडे प्रक्रिया पाणी पाठविल्यास CETP वर जास्त भार (load) येणार नाही. व पुढे एकत्रित सांडपाण्यामुळे होणा-या प्रदूषणाची तिव्रता कमी राहील. त्यामुळे श्री.भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांनी कंपन्यांचे मॉनिटरींग वाढवावे व कंपन्यांमधून जास्तीतजास्त नमूने घेवून त्यांच्यावर कडक कार्यवाही करावी व जी कंपनी जुमानत नसेल, अशांची यादी या समितीपुढे ठेवावी. त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्यात येईल. तसेच वेळ पडल्यास अशा कंपन्या बंद करण्याची कारवाई प्रदुषण नियंत्रण अधिका-या मार्फत करण्यात येईल, असे सांगितले. सीईटीपी सुध्दा योग्य त्या निकषा प्रमाणे चालावावेत. तसेच सीईटीपीने सुध्दा मॉनिटरींग करावे व अशा प्रदूषण करणा-या कंपन्यांची यादी म.प्र.नि.मंडळास दयावी. अशा कंपन्यांवर कडक कार्यवाही करण्याची जबाबदारी म.प्र.नि.मंडळावर राहिल असे सुचविले. तसेच पुढे प्रदूषण कमी करण्यासाठी या समितीत तसा ठराव घेवून कंपन्यांवर कडक कार्यवाही करण्यात येईल. वेळ पडल्यास त्यांचे deposit forfeit करण्याबाबत MPCB ने कार्यवाही करावी अशा सुचना देण्यात आल्या.

श्री.वायडा, सहायक उपआयुक्त, मस्त्य व्यवसाय विभाग यांनी म.प्र.नि.मंडळा सोबत समुद्रातील पाण्याची नमूने वेळोवेळी घेवून त्यावर मॉनिटर करावे व या समितीच्या बैठकीत सदर बाब निदर्शनास आणून दयावी.

श्री.भोसले यांनी सर्व कंपन्यांचे ईटीपी १०० टक्के efficiency ने चालतात किंवा नाही यावर नियंत्रण ठेवावे व त्याचा वेळोवेळी अहवाल सादर करावा. मऔविम मंडळाचे उप अभियंता, श्री.एन.एम.करवा यांना यापुढे प्रत्येक मिटिंग साठी बोलावण्यात यावे व त्यांनी कोणतीही सम्प ओव्हरप-लो होणार नाही याबाबत काळजी घ्यावी असे सांगितले.

अध्यक्षानी बैठकीत उपस्थित श्री.पागधरे, अध्यक्ष, पालघर मच्छिमार विकास संघ यांना तुमचे काय म्हणणे आहे. तसेच त्यांनी सध्या मऔविम च्या पाईपलाईन बदलण्याच्या प्रक्रियेस का विरोध केला आहे, असे विचारले. त्यावर श्री.अनिल पागधरे, अध्यक्ष, पालघर मच्छिमार विकास संघ यांनी सांगितले की, गेल्या ३० वर्षापासून मऔविम विना प्रक्रिया करता सांडपाणी सोडत आहे. यापुढे मऔविम वाढीव पाईपलाईन टाकून जास्तीचे सांडपाणी सोडील यामुळे आमचा विरोध आहे. त्या श्री.ननावरे, सदस्य सचिव तथा उप अभियंता, मऔविम, ड्रेनेज उपविभाग, तारापूर यांनी सदरची पाईपलाईन हि वाढीव नसून जूनी सिमेंटची पाईप लाईन वारवार नादूरुस्त होते ती बदलून नविन एचडीपीई पाईपची वाहिनी टाकण्यात येत आहे. ती वाढीव वाहिनी नाही असे सांगितले. त्यावर अध्यक्षांनी श्री.अनिल पागधरे, अध्यक्ष, पालघर मच्छिमार विकास संघ यांना याबाबत सविस्तर समजावून सांगितले व अशा प्रकारे मऔविमच्या नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामास विरोध करु नका असे सांगितले. श्री.अनिल पागधरे, अध्यक्ष, पालघर मच्छिमार विकास संघ यांनी आमचा विरोध विकास कामास नाही, फक्त सांडपाणी प्रक्रिया करुनच सोडावे असे सांगितले. त्यावर अध्यक्षानी सदर कामास विरोध करु नका. मऔवि महामंडळास कामे सुरु करण्याचे आदेश दिले व गरज पडली तर अध्यक्ष प्रत्यक्ष कामाची व समुद्राची पाहणी करतील, असे सांगितले.

३. आपातकालीन परिस्थितीमध्ये म.प्र.नि.मंडळाच्या मदतीने जल प्रदूषणा संबंधी पंचनामे करुन नमूने गोळा करणे, सदर नमुने संकलनाच्या वेळी उद्योग, साईटीपी, एमआयडीसी यांचे प्रतिनिधी व किमान दोन स्थानिक सदस्य उपस्थित असावेत.

आपातकालीन परिस्थितीत औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांचे सॅम्पल घेताना इतर अधिका-यांसह नवापूर मच्छिमार विविध कार्यकारी संस्थेच्या दोन सदस्यांना सोबत घ्यावे. तसेच मऔविम च्या क्षेत्राबाहेरील कंपन्या प्रदूषण करत असतील तर त्यांनी संबंधित खात्याची परवानगी घेवून कंपनी सुरु करणे अपेक्षित आहे असे कोणी विनापरवानगी करत असेल तर त्याची माहिती या समितीपुढे आणावी त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

४. सदर नमुने समिती अध्यक्षांच्या मान्यतेने शासनाचा अथवा शासनमान्य प्रयोगशाळेत पृथःकरणासाठी पाठविण्यात यावेत याची संपूर्णकार्यवाही उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, तारापूर यांनी करावयाची आहे. या करीता येणारा खर्च सीईटीपी व्यवस्थापनाकडून देय असेल.

मुद्दा क्र.४ नुसार दर महिन्यात म.प्र.नि.मंडळाच्या अधिका-यानी सांडपाण्याचे नमूने घेवून त्याचे अहवाल यापुढे प्रत्येक महिन्यास या समितीस दयावे. मासे मरतूकी झाली तर श्री.वायडा, सहायक उपआयुक्त, मस्त्य व्यवसाय विभाग व श्री.भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, तारापूर यांनी सदर नमूने जमा करावेत, मास्यांचे vesara चे पृथःकरण करावे व कोणत्या रसायनामूळे मासे मेले हे शोधून संबंधित कपनीवर कडक कार्यवाही करावी असे अध्यक्षाने सूचविले.

५. तारापूर एमआयडीसीतील जल प्रदुषणामुळे नैसर्गिक जलस्त्रोत शेती, मत्स्य व्यवसाय इ. वर विपरित परिणाम झाल्यामुळे येणा-या तक्रारी, वर्तमानपत्र, दुरचित्रवाहिनीवर प्रसिध्द झालेल्या बातम्यांच्या अनुषंगाने, सदरील ठिकाणी संबंधित विभागामार्फत भेटी देण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीच्या अभिप्रायासह सविस्तर अहवाल गठित केलेल्या समितीचे अध्यक्ष व उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, तारापूर यांच्याकडे पाठविण्यात यावा.

याबाबत अध्यक्षानी अशा काही सदस्यांच्या तक्रारी आहेत काय? अशी विचारण केली. अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यावर संबंधित विभागाने त्याचा अहवाल या समितीस दयावा, त्याबाबत मुख्यतः म.प्र.नि.मंडळाने पुढाकार घेऊन त्वरील कार्यवाहीचा अहवाल समितीपुढे ठेवावा.

६. मासे मर्तुकीबाबतच्या तक्रारी प्रसंगी संबंधित विभागाच्या स्थानिक अधिका-यांनी समिती अध्यक्षांच्या निर्देशानुसार नमुने गोळा करुन उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ तारापूर यांच्याकडे पाठवावेत. सदर नमुने परिक्षण अहवाल प्रादेशिक वैज्ञानिक प्रयोगशाळा, महाराष्ट्र शासन, ठाणे यांचेकडून प्राप्त करुन घेऊन सदर अहवाल समिती अध्यक्ष यांचेकडे पाठविण्यात यावा.

मुद्दा क्र.६ चे वाचना नंतर याबाबत म.प्र.नि.मंडळाने या संबंधी आजपर्यंत पाठविलेल्या नमून्याचे अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करावेत, असे अध्यक्षांनी सूचविले.

७. तारापूर एमआयडीसी व परिसरात अनधिकृतरित्या घातक घनकचरा टाकत असल्याचे आढळल्यास म.प्र.नि.मंडळाच्या स्थानिक कार्यालयास अवगत करणे.

त्यावर अध्यक्षानी, श्री.ननघरे, उपअभियंता, मऔविम, तारापूर यांना विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, जिल्हा परिषद तर्फे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले असून, दि.११/०९/२०१४ रोजी घनकच-याच्या व्यवस्थापनेसाठी भूखंडाची निवड करणेकामी प्रादेशिक अधिकारी, मऔविम यांच्यासह क्षेत्रव्यवस्थापक व भूमापक हे भूखंडाची पाहणी करणार आहेत. भूखंड निश्चित झाल्यावर, मऔविम च्या प्रचलित नियमानुसार सदर भूखंडास मंजूरी घेवून, तो ग्रामपंचायतीस देण्यात येईल, असे सांगितले. त्यावर अध्यक्षानी सदरचे काम तातडीने सुरु करा, असे सांगितले.

८. खाडीतील पाण्याचे नमुने सहा महिन्यातून किमान एक वेळ घेऊन म.प्र.नि.मंडळाकडे सुपूर्द करुन आवश्यक उपाययोजना सूचविणे.

खाडीच्या पाण्याचे नमूने श्री.भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ तारापूर व श्री.वायडा, सहा. उपआयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग यांनी घेवून त्याचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्यास अध्यक्षांनी सूचविले.

९. एमआयडीसी परिसरातील पर्यावरण संवर्धनाबाबत उद्योग, सीईटीपी, एमआयडीसी, म.प्र.नि.मंडळ यांच्या सहकार्याने अंमलबजावणीकरीता विशेष प्रकल्प सुचविणे.

याबाबत अध्यक्षानी यापूर्वी पाठविलेल्या अहवालावर प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मडळ, ठाणे यांनी काय कार्यवाही केली त्याचा अहवाल या समितीस सादर करावा असे उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळास सांगितले. तसेच ९२ पैकी ज्या ४२ कंपन्या योग्य ती प्रक्रिया न करता सांडपाणी सोडतात त्यावर पुन्हा कार्यवाही करण्याबाबत उपप्रादेशिक अधिकारी यांनी शिफारस केल्यानंतर प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मडळ, ठाणे यांनी काय कार्यवाही केली, त्यांचे डिपॉझिट फॉर फिट केले की नाही हे प्रादेशिक अधिकारी यांनी समितीस सादर करावे व पुढील बैठकीत श्री.भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, तारापूर यानी पुढील सभेपर्यंत दोषी कंपन्यांवर काय कार्यवाही केली, त्याबाबतचा पूर्ण अहवालासह प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांना बैठकीस उपस्थित राहण्यास कळवावे, असे सांगितले.

१०. समितीच्या बैठकीचा अहवाल शिफारशीसह अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, ठाणे यांना तीन दिवसांत पाठविणे

याबाबत अध्यक्षांनी संबंधितांनी योग्य ती कार्यवाही तातडीने करावी व अहवाल समितीस सादर करावा असे सांगितले.

११. सदर प्राप्त अहवालावर प्रादेशिक अधिकारी, ठाणे यांच्यातर्फे पुढील ७ दिवसांत कारवाई करणे.

याबाबत अध्यक्षांनी संबंधितांनी योग्य ती कार्यवाही तातडीने करावी व अहवाल समितीस सादर करावा असे सांगितले.

१२. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, ठाणे सदर समितीच्या भेटीचा व कारवाईचा अहवाल म.प्र.नि.मंडळाच्या संकेतस्थळावर ठेवणे.

याबाबत अध्यक्षांनी संबंधितांनी योग्य ती कार्यवाही तातडीने करावी व अहवाल समितीस सादर करावा असे सांगितले.

१३. सदर समिती आदेशाच्या दिनांका पासून एक वर्षासाठी कार्यरत राहील. समितीची कालमर्यादा वाढविणे अथवा पुर्नगठित करण्याचे सर्वाधिकार "सदस्य सचिव" म.प्र.नि.मंडळ, मुंबई यांचेकडे राहतील.

आयत्यावेळी अध्यक्ष, नवापूर मच्छिमार विविध कार्यकारी संस्था यांनी मऔविमने नवापूर येथे पाईपलाईन लिकेज झाल्यामुळे शेतकऱ्यांची नुकसान भरपाई दिलेली नाही, असे सांगितले. त्यावर श्री.ननवरे यांनी सन १९८० मध्ये सदर पाईपलाईन लिकेज झाली होती व संबंधित शेतकऱ्यांना सन २०१० पर्यंत नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे. पण सन २०१० ते २०१४ पर्यंतच्या नुकसान भरपाईचा प्रस्ताव मंजूरीसाठी वरिष्ठ कार्यालयात पाठविला आहे. तो मंजूर झाला तर सदर शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात येईल. मा.अध्यक्षांनी याबाबतचा अहवाल पुढील बेठकीत समितीपुढे ठेवावा असे सुचविले.

सर्वात शेवटी अध्यक्षानी सर्वांचे आभार मानून सभेची समाप्ती केली.

अध्यक्ष
औद्योगिक वसाहत पर्यावरण रक्षण
व संवर्धन समिती, तारापूर तथा
उप विभागीय अधिकारी
पालघर विभाग, पालघर

दि. 11/9/2015.

आज दि. 11/09/2015 रोजी मा. अध्यक्षांच्या "औद्योगिक वसाहत, तारापूर पर्यावरण रक्षण व संवर्धन समितीची सभा आयोजित केली होती. सदर सभेस खाली नमूद केलेले अधिकारी व सदस्य उपस्थित होते.

| अनु-क्रमांक | अधिकाऱ्यांचे व सदस्यांचे नाव | पदनाम | सही. |
|---|---|---|---|
| 1. | श्री. शिवाजी दावभट | अध्यक्ष | |
| 2 | श्री. रविंद्र कि. [illegible] | सहाय्यक आयुक्त मत्स्य. पालघर | |
| 3) | Mr S.B. Shetty | Hon. Secretary | |
| 4) | Mr Gaikwad | Director | |
| 5. | V.K. Gogri | V.P. TIMA | |
| 6 | S.S. Nanaware | Deputy Engineer | |
| 7 | S.R Bhosale | SRO Tarapur | |
| 8 | H.V. Kulkarni | Field officer | |
| ~~9~~ | ~~V.D. Gadonde~~ | | |
| 9 | गजानन जाधव | manager (TEPT) | |
| 10 | S.B. Ubale | AE MIDC | |
| 11 | मधुकर विष्णू आरी | माहिमा... वि. का. संघ... | |